# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 05 November 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०५ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

जग आज अनेक आघाड्यांवर अस्तित्वाची लढाई लढत आहे, अशावेळी बुद्धांची शिकवण मानवजातीला उपयोगी पडते, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. राष्ट्रपती आज दिल्ली इथं आयोजित पहिल्या आशिया बुद्धीस्ट परिषदेला संबोधित करत होत्या. बौद्ध धर्माचा शांतता आणि अहिंसेचा संदेश आज जगभर जाण्याची आवश्यकता असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या.

****

राजकीय नेत्यांच्या प्रचारसभांना आजपासून राज्यात सुरुवात होत आहे. भाजप नेते, उपमुख्यमंत्री आणि दक्षिण पश्चिम नागपूरचे उमेदवार देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथून जनसंपर्क रॅली काढून प्रचाराचा प्रारंभ केला. पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार विकास ठाकरे हे देखील नागपूर इथे जनआशीर्वाद यात्रा काढून प्रचाराची सुरुवात करत आहेत. सायंकाळी साडे चार वाजता ही यात्रा सुरु होईल. दरम्यान उत्तर नागपूरचे आमदार डॉ नितीन राऊत देखील आज शहराच्या विविध भागात प्रचार करणार आहेत.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आज विदर्भात प्रचार दौऱ्यावर आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील वणी आणि राळेगाव मतदारसंघातील उमेदवारांसाठी त्यांच्या जाहीर सभा होणार आहेत. राळेगाव इथं चार वाजता मनसेचे उमेदवार अशोक मेश्राम यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेला राज ठाकरे संबोधित करणार आहेत. त्यानंतर सायंकाळी सहा वाजता मनसेचे वणी इथले उमेदवार राजू उंबरकर यांच्या प्रचारार्थ राज ठाकरे यांची शासकीय मैदानावर जाहीर सभा होणार आहे.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज कोल्हापूर दौऱ्यावर आहेत. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी उद्या नागपूर दौऱ्यावर येणार आहेत.

****

भंडारा विधानसभा मतदार संघातील शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे बंडखोर उमेदवार नरेंद्र पहाडे तसंच काँग्रेसच्या उमेदवार पूजा ठवकर यांनी देखील शहरात रॅली काढून प्रचार सुरु केला आहे. शहरात अनेक ठिकाणी पहाडे यांच्या प्रचारार्थ पथनाट्य सादर करण्यात येत आहे. गोंदिया जिल्ह्यातल्या आमगाव देवरी विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार संजय पुराम यांनी ही प्रचाराला सुरवात केली आहे. संजय पुराम यांना भारतीय जनता पक्षाने सलग तिसऱ्यांदा निवडणूक लढण्याची संधी दिली आहे.

****

निवडणूक निरीक्षक गिरीशा पी. एस. यांनी अकोला जिल्हा निवडणूक कार्यालयातील, तसंच निवडणूक निर्णय कार्यालयांतील विविध कक्षांची पाहणी करून कामकाजाचा आज आढावा घेतला. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार प्रत्येक तरतुदीचे काटेकोर पालन करावं, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

****

रायगड जिल्ह्यातल्या अलिबाग–मुरुड मतदारसंघाचे भाजपचे पदाधिकारी दिलीप भोईर यांचं पक्षातून ६ वर्षासाठी निलंबन करण्यात आलं आहे. महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांच्याविरुद्ध दिलीप भोईर मैदानात उतरले होते. पक्षश्रेष्ठींच्या सूचनेनंतर देखील भोईर यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही, त्यामुळं त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती भाजप खासदार धैर्यशील पाटील यांनी दिली.

****

प्राप्तीकर कायद्याच्या समीक्षेसंदर्भात आयकर विभागाला गेल्या एक महिन्याच्या कालावधीत साडे सहा हजारांहून अधिक सूचना प्राप्त झाल्या आहेत. आयकर अधिनियम १९६१ संदर्भात या सूचना मागवण्यात आल्या होत्या. या अधिनियमासंदर्भात विचारविनिमयासाठी आयोजित बैठकीत काल केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची अध्यक्ष म्हणून उपस्थिती होती. राजस्व सचिव संजय मलहोत्रा, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवि अग्रवाल यांच्यासह अनेक उच्चपदस्थ अधिकारी यावेळी उपस्थित होते. आयकर अधिनियमाच्या विविध

गटांच्या समीक्षेसाठी यावेळी तज्ज्ञांच्या २२ विशेष उपसमित्या यावेळी गठीत करण्यात आल्या.

****

शेअर बाजारातील व्यवहाराला आजही घसरणीनं सुरुवात झाली. एनएसई–निफ्टी ७९ अंकांच्या घसरणीसह २३१९७ वर उघडला, तर सेन्सेक्स २४० अंकांनी घसरुन ७८५४२ पर्यंत आला. दरम्यान, सोने आणि चांदीच्या दरात सलग दुसऱ्या दिवशी घसरण झालेली पाहायला मिळत आहे. आज २४ कॅरेट सोन्याचा दहा ग्रॅमसाठी ७८, ६१० रुपये आणि २२ कॅरेट सोन्याचा दहा ग्रॅमसाठी ७८, ४४० रुपये एवढा दर आहे. तर, चांदीचा दर ९४, ४९० रुपये किलो आहे.

****

छठ महापर्वाला आज नहाय खायनं प्रारंभ होत आहे. सूर्य उपासनेच्या चार दिवसांच्या या अनुष्ठानात उद्या संध्याकाळी शाम खरना हा विधी संपन्न होईल. या उत्सवात तिसऱ्या दिवशी संध्याकाळी असताचलगामी सूर्य आणि चौथ्या दिवशी सकाळी सूर्योदयसमयी पवित्र नद्यांच्या किनारी सूर्याला अर्घ्य अर्पण करुन पूजा करण्यात येते आणि महोत्सवाची सांगता होते.

****